**अत्यंत महत्वाचे पत्र**

जा.क्र./कृमावि/वि.प्र४/पुरस्कार/२६७/२०१८,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
दि. ०५/०६/२०१८

**प्रति,**

**१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद... (सर्व )**
**२. विभागीय कृषि सहसंचालक, ...................... (सर्व )**
**३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,..................... (सर्व )**
**४. कृषि विकास अधिकारी, जि.प,........................(सर्व )**

**विषय - सन २०१८-१९ मधील विविध कृषि पुरस्कारांकरिता प्रस्ताव सादरकरणेबाबत...**

**संदर्भ-** १. मार्गदर्शक सुचना- विविध कृषि पुरस्कार जा.क्र./कृमावि/विप्र४/कृषि पुरस्कार/५३५/२०१६, दि.०३/०९/१६
२. मार्गदर्शक सुचना-शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार जा.क्र./कृमावि/विप्र४/कृषि पुरस्कार/५३६/१६, दि.३/९/१६
३. मार्गदर्शक सुचना- कृषि सेवारत्न पुरस्कार जा.क्र./कृमावि/विप्र४/कृषि पुरस्कार/५०५/२०१६,दि.२५/८/१६
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./ कृमावि / विप्र४/ कृषि पुरस्कार/ ३३७/२०१७, दि.२६/०५/१७
५. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./विप्र४/पुनिब/२५५/२०१८, दि.२८/०५/१८

दरवर्षी राज्यात कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, कृषि पत्रकार, गट तसेच संस्था यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र आणि वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. तसेच राज्यातील शेतीविषयक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील एक अतिउत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यास राज्य शासनाव्दारे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार देऊन गौरविणेत येते.

या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, सन २०१६ करिता उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ३ अन्वये, निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन सन २०१८ करिता डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कारासाठीचे प्रस्ताव रीतसर सादर करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. विविध कृषि पुरस्कारांकरीता पुरस्कारार्थी निवडीबाबत निकष आणि कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणेसाठी तसेच सध्या अस्तित्वात असलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करून सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित होणेसाठी संदर्भ क्र.५ अन्वये, शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यानुसार झालेले बदल आपणास कळविण्यात येतील.

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :-**
**माहितीसाठी सविनय सादर.**
१. मा.अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. विभागीय आयुक्त, महसूल (सर्व)
३. मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे

**माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित**
१. कृषि संचालक (सर्व)
२. कृषि सहसंचालक (आस्थापना)
३. प्रकल्प संचालक (आत्मा), सर्व

Scanned by CamScanner

**कृपया आपले स्तरावरून विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्वरीत कळवावे.**

**वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार**
**<u>मार्गदर्शक सुचना २०१६-१७</u>**

जा.क्र.कृमावि/विप्र-४/कृषि पुरस्कार पत्र/५३६/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक :-०३/०९/२०१६

**प्रति,**
**१) मुख्य कार्यकारी अधिकारी**
**--- जिल्हा परिषद (सर्व)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,(सर्व)**

संदर्भ : १) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-२१९१/प्रक्र.१०४/११अे, दि.३० सप्टेंबर १९९१
२) कृषि व पदुम विभाग क्र. शासन निर्णय क्र.कृसंप्र-२१९३/सीआर-११६/११-अे दि.२७ मे १९९४
३) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-२१/२०००प्रक्र.११४/११अे, दि.१नोंव्हेबर २०००
४) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-१२०७/प्रक्र.१(भाग-२)/११अे, दि.२३ जून२००८
५) शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-२०१३/प्रक्र.१७८/११अे, दि.०६ सप्टेंबर २०१४

**विषय :-सन २०१६ मधीलवसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारांकरीता शेतकरी निवड आणि प्रस्ताव सादर करणेबाबत................**

शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान शेतीमध्ये सुधारीत शेती औजरांचा वापर, जमिनीच्या प्रतवारीप्रमाणे पिकांची लागवड, जमिनीचे सपाटीकरण, कंटुर पध्दतीने पेरणी, रासायनिक खतांचा सुयोग्य वापर, विहीर / नाला इत्यादीमधील पाणी अडवुन शेतीतील नालाबडींग इत्यादीव्दारे तसेच तुषार व ठिबक सिंचन पध्दतीव्दारे पाण्याचा सुयोग्य वापर, पिक संरक्षक औषधांची वेळेवर फवारणी, शेती पुरक व्यवसाय, हलक्या व कोरडवाहू जमिनीत फळझाड, निलगिरी, सुबाभुळ इत्यादींची लागवड करणे, स्वतःच्या कल्पनेने नवनवीन पध्दतीने पीक लागवड व जवळपास शेतक-यांना शेती मशागतीचा उपयोग करण्यास मार्गदर्शन करणे, शासन/सहकारी संस्थेकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेचा शेतीसाठी सुयोग्य वापर व त्या कर्जाची वेळेवर परतफेड करणे, इत्यादी निकषांतर्गत शेतीमध्ये शेतक-यांचे एकंदरीत कार्य विचारात घेऊन राज्य शासनाच्या कृषि विभागाकडून सर्वसाधारण आणि आदिवासी गटातील शेतक-यांना शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.रुपये ११,०००/- रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष :**

१) शेतकऱ्यांच्या स्वतःच्या नावावर शेती असावी आणि तो कुटुंबीयासह शेती करणारा असावा.
२) प्रस्तावित शेतकरी हा शेतीपुरक धंद्याव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय किंवा नोकरी करणारा नसावा.
३) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकार संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति पात्र असणार नाही.

४) आदिवासी शेतकऱ्यांच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
५) एकापेक्षा जास्त वेळा शेतीनिष्ठ म्हणून शेतकऱ्यांची निवड केली जाणार नाही.
६) सर्व साधारण आणि आदिवासी अशा दोन्ही गटाच्याबाबतीत ५ किंवा त्याहुन जास्त सालदार ठेवणारा शेतकरी नसावा.
७) प्रस्तावीत शेतकरी हा शेतकरी मासिकाचा सभासद असावा.
८) प्रस्तावीत शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीतच सादर करणे आवश्यक आहे.

९) प्रस्तावीत शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु.१००/-च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

**कार्यपध्दती :-**

**१) मार्गदर्शक सुचना प्राप्त होताच जिल्हा / विभाग स्तरावरुन प्रादेशिक वर्तमानपत्र,आकाशवाणी,आणि दुरदर्शन इ.माध्यमाव्दारे विस्तृत प्रमाणात प्रसिध्दी देऊन खाली दर्शविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व निकषानुसार पात्र पुरस्कारार्थीचे जास्तीत जास्त प्रस्ताव तालुका पातळीवरुन येतील याबाबत नियोजन करावे.**

१) या पुरस्काराकरीता पुढीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करुन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी .

**अ)** तालुका स्तरीय समितीकडून ३१ डिसेंबर २०१६ पुर्वी सर्व प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस सादर करावे.

**ब)** जिल्हास्तरीय समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी व अनुषंगीक कार्यवाही करुन ३१ जानेवारी २०१७ पर्यंत विभागीय स्तरीय समितीकडे सादर करावेत.

२) आयुक्तालयास प्रस्तावसादर करतानासंबंधितांचे दोन पासपोर्ट साइज फोटो स्टेपल न करता तसेच फोटोच्या मागे शेतकऱ्याचे संक्षिप्त नाव व मोबाईल नंबर नमुद करून लिफाप्यामध्ये सादर करावेत.
३) तालुकास्तरीयसमितीने प्रस्तावित शेतकऱ्यांच्या शेतीवर अध्यक्षांसह सर्व सदस्यांनी एकत्रितरीत्या भेटीचा दौरा कार्यक्रम आखुन पाहणीच्या वेळी रंगीत छायाचित्रे व व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात यावे.
४) शेतीनिष्ठशेतकऱ्यांच्यानिवडीसाठीतालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर समित्या व त्यांची कार्य पुढीलप्रमाणे राहतील.

**अ) तालुकास्तर – तालुका स्तरीय समिती :-**

१) सभापती पंचायत समिती - अध्यक्ष

२) मंडळ कृषि अधिकारी - सदस्य

३) पशुधन अधिकारी - सदस्य

४) कृषि अधिकारी,पंचायत समिती - सदस्य

५)तालुका कृषि अधिकारी - सदस्य सचिव

**तालुकास्तरीय समितीने करावयाचे कामकाज :-**

१. तालुकास्तरावरुन आदिवासी (जेथे संबंधीत आहे तेथे) आणि सर्वसाधारण गट याप्रमाणे शिफारस करावयाची आहे. तसेच शिफारस पाठविताना भटक्या व मागास वर्गीयांना प्राधान्य देण्यात यावे.

२. शिफारस केलेल्या शेतकऱ्यांची पुढील दोन प्रकारची प्रपत्रे सादर करावीत.

**प्रपत्र.अ)** यामध्ये संबंधीत शेतकऱ्याच्या वैयक्तिक माहितीचा समावेश आहे.

**प्रपत्र.ब)**यामध्ये शेतकऱ्याने आपल्या शेतीची (सुधारीत प्रपत्र शासन निर्णय दिनांक ०६.९.२०१४ नुसार) स्वप्रयत्नांने कशी सुधारणा केली याबाबतच्या माहितीचा गुणतक्त्यासह समावेश आहे.

उपरोक्त दोन्ही प्रपत्रे काळजीपूर्वक व बिनचूक भरावीत.

३. नमुना प्रमाणपत्रअ प्रस्तावासोबत सादर करावे.

४. शासन निर्णय दि. ०६.९.२०१४ नुसार शेतकऱ्यांना वेगवेगळया मुद्यावर गुण देण्यात यावेत व त्याप्रमाणे गुणांचा तक्ता भरावा.

५. सादर केलेला प्रस्ताव आणि त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यावर उक्त समितीचे अध्यक्ष अथवा सदस्य सचिव यांचेपैकी एकाची सुध्दा तारखेसह सही नसेल अथवा प्रस्ताव अपूर्ण असेल तर असा प्रस्ताव फेटाळण्यात यावा. तो फेटाळल्यानंतर उक्त प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अपील दाखल करुन घेतले जाणार नाही, हे सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणावे.

**ब)जिल्हास्तर - जिल्हा स्तरीय निवड समिती :-**

१) जिल्हा कृषि विषयक समितीचे सभापती. - अध्यक्ष

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी - सदस्य

३) प्रकल्प संचालक (आत्मा) - सदस्य

४) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी - सदस्य

५) संबंधित सरव्यवस्थापक पणन मंडळ - सदस्य

६) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य सचिव

**समितीने करावयाचे कामकाज :-**

१) तालुकास्तरीय निवड समितीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी करुन त्रुटीची पुर्तता करुन घ्यावी.

२) प्रस्तावातील शेतकऱ्यांच्या शेतीवर अध्यक्षासह सर्व सदस्यांनी एकत्रितरित्या भेटीचा दौरा कार्यक्रम आखावा, आणि तो मान्य झाल्यावर एकत्रितरित्या प्रस्तावित शेतकऱ्यांच्या शेतीस भेट द्यावी आणि शेतीची पहाणी करावी. त्यांच्या शेतीबाबत असलेली आधारभूत माहिती तपासावी. शेतकऱ्यांस वेगवेगळया मुद्यांवर जे गुण द्यावयाचे ते गुण त्या शेतकऱ्यांच्या शेतात समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी स्वतंत्ररित्या द्यावेत. गुणांची बेरीज तपासावी.

गुणतक्त्यातील प्रत्येक पृष्ठ स्वतंत्ररित्या तारखेसह सही करुन प्रमाणित करावे. त्यानंतर हा गुणतक्ता निवड समितीचे अध्यक्ष व प्रत्येक सदस्यांने वेगवेगळया पाकीटात घालून सिलबंद करुन त्या पाकीटावर अध्यक्षाने / सदस्याने तारखेसह सही करावी, असे बंद केलेले पाकीट समितीचे अध्यक्ष यांनी ताब्यात घ्यावे. याप्रमाणे अध्यक्षाकडे स्वतःचे व प्रत्येक सदस्याचे सिलबंद पाकीट राहील.

३) प्रस्तावित शेतीनिष्ठापैकी पहिल्या शेतकऱ्याचे अशा तऱ्हेचे कामकाज संपल्यानंतरच निवड समितीने प्रस्तावित केलेल्या दुसऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीस भेट द्यावी आणि वर नमूद केल्याप्रमाणे तपासणी करुन, गुण देऊन गुणांचा तक्ता तयार करुन तारखेसह सही करुन पाकीटात सिलबंद करुन त्या पाकीटावर समितीच्या सदस्यांने व अध्यक्षांनी तारखेसह सही करावी, अशा तऱ्हेने प्रस्तावित केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे शेतीस भेट देऊन कामकाज करावे.

४) उपरोक्त कार्यवाही पूर्ण झाल्यावर शेतीनिष्ठ शेतकरी निवड समितीचे अध्यक्ष यांनी कृषि विषयक समितीची सभा सत्वर आयोजित करावी. या सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनाही आमंत्रित करावे. या सभेमध्ये शेतीनिष्ठ निवड समितीने सर्व प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे शेतीला भेट दिल्याबाबत आणि प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्याला गुण दिल्याबाबत आणि त्या अनुषंगाने गुणांचा तक्ता तयार केल्याची माहिती सभासदांना द्यावी. सदस्य सचिव यांनी प्रत्येक सभासदाने भरलेली प्रत्येक प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांच्या गुणांचा तपशील असलेली सीलबंद पाकिटे समितीपुढे सादर करावीत. कृषि विषयक समितीचे अध्यक्षानी प्रत्येक पाकीट सीलबंद असल्याचे नमुद करुन प्रत्येक पाकीटावर तारखेसह सही करावी आणि ही पाकीटे सदस्य सचिव यांनी समितीमध्ये सभासदांसमोर उघडावीत. उघडलेल्या सर्व गुणतक्त्यावर कृषि विषयक समितीच्या अध्यक्षानी ती पाहिली आहेत आणि त्यांचे समक्ष उघडली आहेत, असे प्रमाणित करुन तारखेसह सही करावी. अशा प्रकारे केलेल्या गुणांच्या तक्त्यांची एकत्रित गुणांची यादी सदस्य सचिव तसेच कृषि विकास अधिकारी यांनी सत्वर तयार करावी आणि ती त्याच दिवशी कृषि विषयक समितीस सादर करावी. कृषि विषयक समितीने एकत्रितरित्या केलेली गुणांची यादी तयार करुन गुणानुक्रम लावून प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा क्रम ठरवावा.शेतीनिष्ठ निवड समितीने अथवा अध्यक्षांनी या समितीतील सभासदांनी दिलेले गुणात कोणत्याही परिस्थितीत फेरफार करु नये. असे फेरफार केल्याचे आढळल्यास ती यादी रद्द समजण्यात येईल याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे १ ते ३ याप्रमाणे गुणानुक्रम लावल्यानंतर या यादीस कृषि विषयक समितीने मान्यता द्यावी आणि अशी मान्यता झालेली प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुद्द त्यांच्या सहीने गोपनीय रित्या विभागीय कृषि सह संचालक यांना पाठवावी. प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांची जिल्हा परिषदेने केलेली शिफारस, आखणी केलेली कार्यपध्दती आणि कामकाज हे गोपनीय राहील याची खबरदारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि त्यांचे अधिनस्त काम करणारे अधिकारी यांनी घ्यावी. जिल्हा स्तरावर प्रस्तावित शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे गुणानुक्रमांची यादी मान्य होण्या अगोदर जर त्याबाबत माहिती बाहेर फुटली तर त्या जिल्हयातील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांची निवड रद्दबातल होईल, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

प्रस्तावित शेतकऱ्यांची संख्या कमी असल्यास त्याबाबतची कारणे द्यावीत, ती न दिल्यास प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही आणि त्याची सर्व जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

५) वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्हयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विभागीय स्तरावर नियुक्त केलेल्या समितीकडून छाननी करण्यात यावी. असे छाननी केलेले प्रस्ताव आवश्यकता असल्यास प्रत्यक्ष भेटीव्दारे देखील तपासावेत व समितीचे शिफरशीसह गुणानुक्रमे १ ते ३ प्रस्ताव विभागस्तरावर सादर करावेत.

**क) विभागस्तर –विभागीय स्तरावरील समिती :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय आयुक्त (महसूल) | - | अध्यक्ष |
| २) | विभागीय कृषि सह संचालक | - | सदस्य |
| ३) | विभागीय सह संचालक (पशुसंवर्धन) | - | सदस्य |
| ४) | अधिक्षक कृषि अधिकारी (वि.कृ.स.सं.यांचे कार्यालय) | - | सदस्य सचिव |

**गुणानुक्रमे प्रस्तावित केलेल्या फक्त पहिल्यातीन क्रमांकाच्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव,परिचय लेख आणि विभागीयस्तरावरील समितीच्या बैठकीच्या परीपूर्ण इतिवृत्तासह आयुक्तालयास सादर करावेत.**

शासन निर्णय, कृषि व पदूम विभाग क्र.-कृसंप्र-२०१३/प्रक्र.१७८/११अे, दि.०६ सप्टेंबर २०१४ अन्वयेसोबत जोडलेल्या प्रपत्रातील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांच्या निवडीच्या सुधारीत निकषाप्रमाणे तालुका व जिल्हा पातळीवरील त्यांच्या गुणामध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागणी करण्यात यावी. सदरील गुण त्या त्या स्तरावरील निवड समितीने द्यावयाचे आहेत व त्यात विभागस्तरीय समितीने यांनी फेर बदल करु नयेत.

कृषी विकासांसाठी उल्लेखनीय कामाबाबत कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाचे वतीने कृषी पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या व्यक्ति,संस्थांचा पुनःश्च इतर कृषी पुरस्कारासठी प्रस्ताव प्राप्त होतात. अशा परिस्थितीत प्रस्तावाची गुणवत्तेनूसार शिफारस करतांना यापूर्वी देण्यात आलेल्या कृषि पुरस्कारास पाच वर्षाचा कालावधी झाला असल्याची खात्री करावी.

**टिप :-१.सदरच्या मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.**
**२.प्रस्तावाची फक्त मूळप्रत कृषि आयुक्तालयास पाठविण्यात यावी, व उर्वरीत प्रती जिल्हा व विभाग स्तरावर जतन करून ठेवाव्यात.**

**सोबत प्रपत्र अ व ब आणि प्रमाणपत्र अव ब**

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :- माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा.अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई ३२
२) मा. विभागीय आयुक्त, महसूल (सर्व)
३) मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :-माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषितः-**

१) विभागीय कृषि सह संचालक (सर्व),
२) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**आदिवासी / सर्वसाधारण शेतकरी**

**प्रपत्र अ**

**शेतीनिष्ठ सन्मान योजना प्रस्तावित शेतकऱ्यांची सर्वसाधारण माहिती सन २०१६ करिता**

<table>
<tr><td>१</td><td colspan="4">शेतकऱ्याचे संपुर्ण नांव</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td colspan="4">कायमचा पत्ता ( संपूर्ण पत्ता दयावा)</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td colspan="4">पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td colspan="4">अ. दुरध्वनी क्रमांक (एस.टी.डी. कोडसहीत)<br>ब. भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नंबर)</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td colspan="4">अ. ई-मेल<br>ब. वेबसाईट</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td colspan="4">शेतकऱ्याचा आधार कार्ड क्रमांक व बँकेचा खाते क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td colspan="4">जन्मतारीख व वय</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td colspan="4">शिक्षण</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td colspan="4">कुटुंबात एकूण माणसे किती<br>मोठी माणसे/पुरुष/स्त्रिया /मुलगे/मुली इत्यादी ?</td><td></td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="4">आदिवासी जाती / जमाती, भटक्या / विमुक्त जाती पैकी असल्यास विगतवारी</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td colspan="4">शेती व्यवसाय किती वर्षापासुन करत आहेत ?</td><td></td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="4">कृषि पुरक व्यवसाय</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td colspan="4">कुटुंबाची शैक्षणिक पातळी<br>१) पत्नीचे शिक्षण<br>२) मुले व मुलीचे शिक्षण<br>३) इतर प्रौढ व्यक्तीचे शिक्षण</td><td></td></tr>
<tr><td>१४</td><td colspan="4">लागवडीखाली एकूण क्षेत्र हेक्टर<br>१)बागायत (हेक्टर)<br>२)जिरायत (हेक्टर)<br>३)कुरण/पडीत (हेक्टर)<br>४) एकूण क्षेत्र(हेक्टर)</td><td></td></tr>
<tr><td rowspan="3">१५</td><td colspan="4">मागील तीन वर्षाचे प्रमुख पीकांखालील क्षेत्र आणि हेक्टरी उत्पादकता</td><td rowspan="3"></td></tr>
<tr><td>वर्ष</td><td>पीक</td><td>क्षेत्र</td><td>उत्पादकता</td></tr>
<tr><td>१)२०१२-१३<br>२)२०१३-१४<br>३)२०१४-१५</td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>१६</td><td colspan="4">सिंचन सुविधा- कॅनॉल/ विहीर/उपसा सिंचन /इतर</td><td></td></tr>
<tr><td>१७</td><td colspan="4">सिंचन सुविधा हंगामी आहे की बारमाही आहे.</td><td></td></tr>
<tr><td>१८</td><td colspan="4">अ) उत्पादित मालाची विक्री कोठे केली जाते?</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | गावामध्ये/तालुकास्तरावर/जिल्हास्तरावर/<br>राज्यामध्ये / देशामध्ये/निर्यात<br>ब) मालाच्या विक्रीची पध्दत.<br>कृषि उत्पन्न बाजार समिती/शेतावर/शेतकरी<br>ग्राहक थेट विक्री/बागवान/करारशेती. | |
| १९ | काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो काय ?<br>उदा. प्रतवारी/पॅकिंग इ. | |
| २० | शेतीमध्ये गेल्या ३ वर्षात झालेला निव्वळ खर्च/फायदा –<br>सन २०१२-२०१३ मध्ये एकूण उत्पन्न-----<br>खर्च----<br>फायदा--<br>सन २०१३-२०१४ एकूण उत्पन्न<br>खर्च------<br>फायदा---------<br>सन २०१४-२०१५ मध्ये एकूण उत्पन्न<br>खर्च-------<br>फायदा---------- | |
| २१ | पीक स्पर्धेत सहभाग, स्तर,वर्ष,पीक, हेक्टरी उत्पादन | |
| २२ | हंगाम निहाय वार्षिक नियोजन आराखडा तयार करतात का?<br>असल्यास आराखडा देण्यात यावा. | |
| २३ | शासन/शासन पुरस्कृत संस्थेमार्फत पगार / पेन्शन मिळते काय?(रु. १०० च्या स्टँपवर शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसलेबाबत प्रतिज्ञापत्र) | |
| २४ | पूर्वी मिळालेला सन्मान/पुरस्कार आणि कोणत्या वर्षी व कशासाठी. (प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह ) | |
| २५ | चारित्र्य कसे आहे (सोबत जि.पो.अ.दाखला मुळप्रत असावी) | |
| २६ | वरील व्यक्तीचे केलेले काम सर्वसामान्य शेतक-यांना उपयोगी मार्गदर्शक कसे तसेच त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा उल्लेखनिय कसे याबाबत सविस्तर माहिती. | |
| २७ | परिचय लेख (सोबत स्वतंत्र देण्यात यावा). | |
| २८ | माहिती तंत्रज्ञानाचा कृषि विकासाकरीता वापर करतात का ?<br>कशाप्रकारे करतात ? | |
| २९ | कृषि विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष शेतीस भेट देऊन प्रस्ताव निकषाप्रमाणे योग्य असल्यास शिफारशीसह अभिप्राय द्यावेत. | |

**सही/-**
**कृषि विकास अधिकारी**
**जिल्हा परिषद.........**

**सही/-**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी**
**जिल्हा...............**

**प्रपत्र ब**

**गुणतक्ता**

**शेतकरी गटः- आदिवासी / सर्वसाधारण**

**(१) प्रस्तावित शेतकऱ्याचे नांव व पत्ताः-**

| अ.क्र. | नविन सुधारीत सूचविलेले निकष | एकुण गुण | तालुका पातळी | जिल्हा पातळी |
|---|---|---|---|---|
| १ | **उपलब्ध संसाधनांचा शेती विकासासाठी कसा वापर केला आहे?**<br>अ) उपलब्ध जमिनीचा पुर्णपणे वापर करण्यासाठी पीकरचनाः- | | | |
| | १) पीकरचना जमिनीच्या मगदुरानुसार आहे किंवा कसे? | २५ | १० | १५ |
| | २) पिकरचनेचा त्या परिसरात इतर शेतकऱ्यांनी अवलंब केला आहे काय? | २५ | १० | १५ |
| | ३) पिकरचना अधिक किफायतशीर ठरली आह काय?. | २५ | १० | १५ |
| | **आ) पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी केलेल्या उपाय योजना व पाणीवापर :-**<br>१) जलसंधारण उपचार/जलसंचय उपाय केले आहेत काय? | २५ | १० | १५ |
| | २) जलस्त्रोत निर्मिती /बळकटीकरणासाठी केलेले उपाय | २५ | १० | १५ |
| | ३) उपलब्ध पाणी पुर्ण क्षमतेने वापरणेसाठी पिकरचना योग्य आहे. | २५ | १० | १५ |
| | ४) टंचाई परिस्थितीचा सामना करण्यासाठी व्यवस्था केली आहे. | २५ | १० | १५ |
| | ५) उपलब्ध पाण्याचे सुयोग्य वापरासाठी शास्त्रीय नियोजन केले आहे. | २५ | १० | १५ |
| | ६) पाणी तपासणी केली आहे. | १० | ४ | ६ |
| २ | **निविष्ठा व्यवस्थापन :-** | | | |
| | **अ) बियाणे** :-१. सुधारित/संकरित बियाणेचा वापर | २५ | १० | १५ |
| | २. बियाणे बदल | २५ | १० | १५ |
| | ३. बीज संस्करण | १० | ४ | ६ |
| | **आ) खतेः**१. सुपीकता निर्देशांकानुसार खताचा वापर | २५ | १० | १५ |
| | २. पिकाच्या गरजेनुसार खताचा वापर | २५ | १० | १५ |
| | ३. सेंद्रिय/जैविक खताचा वापर | १० | ४ | ६ |
| | **इ) पीक संरक्षण औषधे** :१. एकात्मिक कीड व्यवस्थापन | २५ | १० | १५ |
| | २.जैविक/नैसर्गिक कीडनाशके वापर | २५ | १० | १५ |
| | ३.सुधारित पीक संरक्षण अवजारे वापर | १० | ४ | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ३ | **यांत्रिकीकरण :-**<br>शेतीच्या कोणकोणत्या कामासाठी यंत्राचा/सुधारीत कृषि औजारांचा वापर केला जातो | | | |
| | १) पूर्वमशागत | २५ | १० | १५ |
| | २) पेरणी/लावणी/रोवणी | १० | ४ | ६ |
| | ३) आंतरमशागत | २५ | १० | १५ |
| | ४) पीक संरक्षण | २५ | १० | १५ |
| | ५) काढणी/कापणी/मळणी | १० | ४ | ६ |
| ४ | **शेतीतील पतपुरवठा व आर्थिक नियोजन :-**<br>१) शेतीसाठी भांडवल उभारणी :- | | | |
| | अ) बँक- सहकारी, राष्ट्रीयकृत बँक | २५ | १० | १५ |
| | ब) व्यापारी/पतसंस्था | २५ | १० | १५ |
| | २) वेळेत परतफेड केली आहे (थकबाकीदार नसल्याबाबत प्रमाणपत्र) | २५ | १० | १५ |
| | ३) किसान क्रेडीटकार्ड धारक आहे | २५ | १० | १५ |
| | ४) शेतीतील गुंतवणूक व उत्पादन याबाबत नोंदी ठेवलेल्या आहेत. | २५ | १० | १५ |
| | ५) पिक विमा योजनेमध्ये सहभाग घेतला आहे. | २५ | १० | १५ |
| ५ | **तंत्रज्ञानाचा अवलंब :-**<br>अ) नविन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी शेतकरी मासीक, शेतीशाळा, चर्चासत्र,मेळावे, विद्यापीठाचे उपक्रम, पीक स्पर्धा,अभ्यासदौरे (राज्यात किंवा राज्याबाहेर ) तसेच प्रदर्शने इत्यादी उपक्रमामध्येसहभाग घेतला आहे. | २५ | १० | १५ |
| | ब) आत्मासात केलेल्या तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये जमिन सुधारणेसाठी/सुपिकता वाढविणेसाठी /बियाणे बदलासाठी/अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी/विशेष उत्पादन वाढीसाठी/सिंचन व्यवस्थापनासाठी/पीक संरक्षणासाठी/काढणी व काढणी पश्चात व्यवस्थापनासाठी/विक्री व्यवस्थापनासाठी/कृषि प्रक्रीयेसाठी/पुरक व्यवसाय प्रसिध्दीसाठी वापर केला आहे. | २५ | १० | १५ |
| ६ | **विक्री व्यवस्थापन :-**<br>अ) शेती उत्पादनाची मालाची विक्री स्वतः करतात.<br>(स्थानिक/बाहेरगावचे बाजारात) | २५ | १० | १५ |
| | आ) व्यापा-यांना प्रत्यक्ष मालाची विक्री करतात. | १५ | ६ | ९ |
| | इ) स्वतः निर्यात करतात. | २५ | १० | १५ |
| | ई)शेती मालाचे मुल्यवर्धन -ग्रेडींग आणि पॅकींग करतात. | २५ | १० | १५ |
| | उ) उत्पादक ते ग्राहक संकल्पनेत सहभाग/करारशेतीमध्ये सहभाग | १० | ४ | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | **एकात्मिक शेती पध्दती :-**<br>अ) कृषि पुरक व्यवसाय<br>(दुग्धव्यवसाय/कुक्कुटपालन/मत्स्यव्यवसाय/मधुमक्षिका/वराहपालन इत्यादी ) | २५ | १० | १५ |
| | आ) कृषि पुरक व्यवसायासाठी लागणारा चारा/पशुखादय स्वतः तयार करतात. | २५ | १० | १५ |
| | इ) कृषि पुरक व्यवसायातील मालाची विक्री स्वतः करतात. | १० | ४ | ६ |
| | ई) कृषि पुरक व्यवसायामधून निर्मीत पशु पक्ष्यांची निविष्ठा/इतर पदार्थांचा सेंद्रीय खत स्वरुपात शेतीमध्ये वापर करतात. | २५ | १० | १५ |
| ८ | **अपारंपारिक उर्जा साधनांचा वापर :-**<br>बायोगॅस/ सौर उर्जा उपकरणे/विद्युत बचतीची साधने | २५ | १० | १५ |
| ९ | **जैव विविधता व्यवस्थापनासाठी केलेले प्रयत्न :-**<br>बियाणे संवर्धन/पशु/पक्षी/किटक संगोपन व संवर्धन/परिसरातील औषधी महत्वाच्या वनस्पतीचे जतन/संयुक्त वनव्यवस्थापन समितीमध्ये सहभाग | १० | ४ | ६ |
| १० | **सामाजिक क्षेत्रातील सहभाग :-**<br>अ) शेतकरी मंडळ/गटामध्ये सहभाग/गट समुह शेती<br>(उदा.आत्मा/नाबार्ड/विद्यापिठ,कृषि मंच इत्यादी) | १० | ४ | ६ |
| | आ) गावातील कृषि /संलग्न सहकारी संस्थेमध्ये सहभाग | १० | ४ | ६ |
| ११ | **तंत्रज्ञान प्रसारातील कार्ये/विस्तार कार्ये** :-<br>अ) प्रात्यक्षिके आयोजनामध्ये सहभाग | १० | ४ | ६ |
| | आ)शेतीशाळेमध्ये सहभाग | १० | ४ | ६ |
| | इ) प्रशिक्षण/कार्यशाळा/चर्चासत्रामध्ये सहभाग | १० | ४ | ६ |
| १२ | **माहितीसाठी उच्चतंत्रज्ञानाचा वापर :-**<br>एस.एम.एस.सेवेचा वापर करतात/ सीयुजी-बीएसएनल कार्डचा वापर करतात/ सीयुजी/इंटरनेटद्वारे बाजार माहिती केंद्राशी संपर्क ठेवतात. | १० | ४ | ६ |
| १३ | शेतकऱ्यांने शेतीमध्ये नाविण्यपुर्ण उपक्रम राबविले आहेत. | २५ | १० | १५ |
| १४ | विविध शासकीय योजनामध्ये सहभाग घेतला आहे. | १० | ४ | ६ |
| | **एकुण** | **१०००** | **४००** | **६००** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सही..................<br>कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद,सदस्य सचिव** | **सही.................<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सदस्य** | **सही.................<br>सबंधित सरव्यवस्थापक, पणन मंडळ, सदस्य** | **सही................<br>प्रकल्प संचालक (आत्मा) सदस्य** | **सही................<br>जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सदस्य** | **सही................<br>जिल्हा कृषि विषयक समितीचे सभापती, अध्यक्ष** |

**प्रमाणपत्र अ**

प्रस्तावितशेतकरी श्री./श्रीमती..........................................................................राहणार ......................तालूका......................................जिल्हा....................................हे / ही शेती करणारा / करणारी शेतीच्या गावी राहणारा / राहणारी स्वतःचे नावावर जमिन असणारा / असणारी असून तो / ती शेतीस पूरक धंदा व्यतिरिक्त नोकरी करत नाही.

| सही.................... मंडल कृषि अधिकारी, सदस्य | सही..................... कृषि अधिकारी, पंचायत समिती, सदस्य | सही.................... पशुधन अधिकारी, सदस्य | सही.................... तालुका कृषि अधिकारी, सदस्य सचिव | सही............. सभापती पंचायत समिती अध्यक्ष |
|---|---|---|---|---|

**प्रमाणपत्र ब**

आम्ही जिल्हास्तरीय शेतीनिष्ठ शेतकरी निवड समितीचे सदस्य, प्रमाणित करतो की, सन..................यावर्षासाठी.................................. शेतकऱ्याचीशिफारस केली असून सदरच्या शेतकऱ्यांचे शेतावर प्रत्यक्ष जाऊन आम्ही शेतीची पाहणी केली असून प्रस्तावीत सर्व शेतकऱ्यांच्या समक्ष भेटी घेतल्या आहेत. प्रस्तावित सर्व शेतकरी हे प्रत्यक्ष शेती करतात, त्यांचे नावावर जमिन आहे, ते शेतीच्या गांवात राहतात, शेतीस पूरक धंदा व्यतिरिक्त ते इतर कोणताही धंदा /नोकरी करीत नाही, याची आम्ही स्वतः खात्री करुन घेतली आहे.

| सही.................. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद,सदस्य सचिव | सही................. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सदस्य | सही................. सबंधित सरव्यवस्थापक, पणन मंडळ, सदस्य | सही................ प्रकल्प संचालक (आत्मा) सदस्य | सही................ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सदस्य | सही................ जिल्हा कृषि विषयक समितीचे सभापती, अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|